## नवी मुंबई महानगरपालिका
## महापालिका सर्वसाधारण सभा

महानगरपालिकेच्या बुधवार, दिनांक 19/07/2017 रोजी भरलेल्या माहे जुलै महिन्याच्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 04.**<br>**दिनांक 19 जुलै 2017** | केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन 2016-17 हरित क्षेत्र विकास (Green Space Development) अंतर्गत प्रस्ताव सादर करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/06/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/उदयान/775/2017. |
| **<u>ठराव क्र. 1846.</u>**<br>**दिनांक 19 जुलै 2017** | "केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन 2016-17 हरित क्षेत्र विकास **(Green Space Development)** अंतर्गत प्रस्ताव सादर करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 1 कोटी, 52 लाख, 27 हजार, 022 मात्र इतक्या अपेक्षित खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 05.**<br>**दिनांक 19 जुलै 2017** | कोपरखैरणे विभागातील श्रमिकनगर झोपडपट्टीत मलनि:स्सारण वाहिन्या टाकणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/03/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./374/2017. |
| **ठराव क्र. 1847**<br>**दिनांक 19 जुलै 2017** | "कोपरखैरणे विभागातील श्रमिकनगर झोपडपट्टीत मलनि:स्सारण वाहिन्या टाकण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 53 लाख, 44 हजार, 879 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 06.**<br>**दिनांक 19 जुलै 2017** | नवी मुंबई महानगरपालिका विद्यमान क्षेत्राची विकास योजना तयार करणेकामी खाजगी संस्थेची नियुक्ती करणे ऐवजी विकास योजनेची कार्यवाही महानगरपालिकेच्या नगर रचना विभागामार्फत करण्याच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, विकास योजना तयार करणेकामी महासभेचा दिनांक 22/08/2013 रोजी मंजूर ठराव क्र. 332 मध्ये अंशत: फेरबदल करुन खाजगी संस्थेची नियुक्ती करणे याऐवजी विकास योजनेसंबंधी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 23 व 38 अन्वयेची संपुर्ण वैधानिक कार्यवाही महानगरपालिकेच्या नगर रचना विभागामार्फत करण्यास, तसेच ठरावाप्रमाणे वेळोवेळीची पुढील वैधानिक कार्यवाही मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने नगर रचना विभागाने करण्यास, सुचविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात यावी." |

| | |
|---|---|
| **ठराव क्र. 1848.**<br>**दिनांक 19 जुलै 2017** | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी भागामध्ये घरगुती नळजोडणी मंजुरी करीता कार्यप्रणाली सुलभ करण्याच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या नळ जोडणी मंजूरीकरीता आवश्यक कागद पत्रे 1) नळ जोडणीचा अर्ज 2) सन 2000 पूर्वीचे सर्वेक्षण पावतीची छायाप्रत 3) आधारकार्डची छायाप्रत सादर करणे. छाननी शुल्क व सुरक्षा अनामत रक्कम परिच्छेद क्रमांक 4 मध्ये नमुद केल्याप्रमाणे आकारणी करणे आणि रस्ता खोदाई शुल्कात पूर्ण सुट देणे. सध्या ज्या ठिकाणी सार्वजनिक नळखांब आहेत अशा झोपड्यांच्या ठिकाणची पाणी देयकाची थकबाकी रक्कम दर चार महिन्यातून एक हप्ता या नुसार तीन समान हप्तांमध्ये भरणा करणे, तसेच ज्या ठिकाणी सार्वजनिक नळखांब अस्तित्वात नाहीत. अशा ठिकाणी पाणी देयक निरंक करणे या धोरणात्मक निर्णयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम क्र. 66 (1) नुसार, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>स्थगित</u>** |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**